महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा)- सत्र-108
अंतीम परिक्षा

पेपर क्र. VIII — सोमवार - 26/08/2013

विषय - गुन्हेगारीशास्त्र, दंडशास्त्र व गुन्हे प्रतिबंध. — वेळ - 15.00 ते 18.00

**Criminology, Penology & Crime Prevention.** — गुण - 100

*************************************************************************

**सुचना-** अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. -- All questions are compulsory.

ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहेत. -- Marks for each question are indicated there- against.

क. वाचनीय अक्षरात लिहावे. शब्द-मर्यादा पाळावी. -- Write legibly. Abide by word limit.

ड. फक्त निळया/काळया बॉलपेनचाच वापर करावा. -- Use blue/black ball point pen only.

*************************************************************************

गुण / Marks

प्र. 1 टिपा लिहा - (प्रत्येकी 05 गुण - प्रत्येकी 60 शब्द) (20)
1 अ. कोंबिंग ऑपरेशन करतांना घ्यावयाच्या दक्षता
1 ब. गुन्हेगारी न्याय संस्थेतील तीन मुख्य संस्था
1 क. पॅ-रोल वर मुक्त होणाऱ्या कैद्यांवरील अटी
1 ड. S.D.P.O. कार्यालयातील रेकॉर्ड आणि रजिष्टर्स

प्र. 2 अ कम्युनिटी पोलीसींग / पोलीस - जनता संबंध ही संकल्पना स्पष्ट करा. सण-उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था राखण्याकरिता व गुन्हे प्रतिबंधाकरिता तुम्ही कार्यरत असणाऱ्या पोलीस स्टेशन हद्दीत 'कम्युनिटी पोलीसींग' अंतर्गत कोणकोणते उपक्रम राबवाल? **(250 शब्द)** (20)

प्र. 3 पोलीस स्टेशन स्तरावर पोलीस उप निरीक्षक या पदावर कार्यरत असताना तुमची नियुक्ती 'विशेष बाल पोलीस पथका' मध्ये झाल्यास 'बालगुन्हेगारीस' प्रतिबंध करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराल? **(150 शब्द)** (10)

प्र. 4 पोलीस स्टेशन गंगापूर येथे कार्यरत असताना रात्रगस्त दरम्यान तुम्हाला नियंत्रण कक्षाकडून एक संशयित वाहन गंगापूर रोडवरुन गंगापूर गावाच्या दिशेने भरधाव जात असल्याची माहिती मिळाली.
नियंत्रण कक्षाकडून तुम्हाला आनंदवल्ली चौकात तात्काळ नाकाबंदी सुरु करण्याबाबत सुचित करण्यात आले. सदर ठिकाणी नाकाबंदी लावताना तुम्ही कोणती कारवाई कराल व काय दक्षता घ्याल? **(150 शब्द)** (10)

प्र. 5 (अ) पांढरपेशा / उच्चपदस्थ लोकांनी केलेले गुन्हे (white collar crime) म्हणजे काय ? **(80 शब्द)** (05)

प्र. 5 (ब) पांढरपेशा गुन्हेगारीची पाच उदाहरणे द्या. **(80 शब्द)** (05)

प्र. 6 डोंगरगाव पोलीस स्टेशन हद्दीत स्वामीनारायण पोलीस चौकी परिसरात ऑगस्ट-2013 च्या अखेरीस अचानक जबरी चोरी व घरफोडीच्या गुन्हयामध्ये वाढ झाल्याचे निदर्शनास आले.
सदर चौकीचे प्रभारी अधिकारी म्हणून सदरचे गुन्हे रोखण्यासाठी काय प्रतिबंधात्मक उपाययोजना कराल ? **(150 शब्द)** (10)

प्र. 7 'सायबर गुन्हे शाखा, नाशिक' येथे कार्यरत असताना तुमच्या परिसरात 'एटीएम फसवणूक' / (ATM Fraud) चे गुन्हे घडू नयेत याकरिता नागरिकांसाठी मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करणेबाबत तुम्हाला सुचित करण्यात आले आहे.
सदर कार्यशाळेत ATM कार्डधारकांना त्यांचेकडील कार्डचा दुरुपयोग होऊ नये याकरिता सावधगिरीबाबत काय सुचना द्याल? **(150 शब्द)** (10)

प्र. 8 टिपा लिहा - (प्रत्येकी 2.5 गुण - प्रत्येकी 50 शब्द) (10)
8 अ. जिल्हा विशेष शाखा
8 ब. M.O.B.
8 क. N.C.R.B.
8 ड. जिल्हा वाचक शाखा

*************************************************************************